पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक १२/०६/२०१९

## जहाल नक्षलवादी नर्मदाक्का व तिचा पती किरण यांस गडचिरोली पोलीसांकडुन अटक

नक्षलवादयांच्या दंडकारण्य स्पेशल झोन समितीची सदस्या तसेच वेस्टर्न सबझोनल प्रमुख उप्पुगंटी निर्मलाकुमारी उर्फ नर्मदाक्का उर्फ नर्मदा दिदी, वय ५८ वर्षे, रा. कोडापावनुरु, गलावरम मंडल जिल्हा कृष्णा (आंध्रप्रदेश) आणि तिचा पती राणी सत्थ्यनारायणा उर्फ किरण उर्फ किरणदादा, वय ७० वर्षे, रा. नरेंद्रपुरम, अमलापुरम जवळ, राजानगरम मंडल, जिल्हा ईस्ट गोदावरी (आंध्रप्रदेश) या दोन्ही जहाल नक्षलवादी दांपत्यास गडचिरोली पोलीस दलाने अटक केली आहे.

गडचिरोली पोलीस दल गेली अनेक दिवसांपासुन या दोन जहाल नक्षलवादयांच्या मागावर होते. सदर नक्षलवादी तेलंगणा राज्यातुन सिरोंचा मार्गे गडचिरोली जिल्हयात प्रवेश करणार असल्याची खात्रीशिर माहिती गडचिरोली व तेलंगणा पोलीसांना मिळाली होती. यानंतर तेलगंणा पोलीसांच्या सहकार्याने गडचिरोली पोलीस दलाने अतिशय शिताफीने सापळा रचुन नर्मदाक्का व तिचा पती किरण या दोघांना सिरोंचा बस स्थानकावरून ताब्यात घेतले.

नर्मदाक्का हिचा नक्षलवादयांनी पोलीसांविरुध्द घडवुन आणलेल्या अनेक नक्षल गुन्हयांत सक्रिय सहभाग होता. १ मे २०१९ रोजी उप विभाग कुरखेडा अंतर्गत मौजा जांभुळखेडा येथे नक्षलवादयांनी घडवुन आणलेल्या भुसुरुंग स्फोटात गडचिरोली पोलीस दलाचे १५ जवान शहीद व १ खाजगी चालक मयत झाले होते. सदर भुसुरुंग स्फोट घडवुन आणण्याच्या नियोजनात नर्मदाक्का व तिचा पती किरण यांचाच मुख्य सहभाग होता. याच बरोबर नक्षलवादी नर्मदाक्का हिचेवर गडचिरोली जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत एकुण ६५ गंभीर गुन्हयांची नोंद आहे. किरण उर्फ किरण कुमार हा दंडकारण्य पब्लीकेशन टिमचा प्रमुख आहे. तसेच नक्षलवादयांच्या प्रभात मासिकाचा देखील तो प्रमुख आहे.या दोन जहाल नक्षलवादंयाच्या अटकेमुळे नक्षल विरोधी कारवाईत गडचिरोली जिल्हा पोलीस दलाला मोठे यश मिळाले आहे.



